e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Sept'25
Issue–IX(I), Volume–XIII

https://doi.org/10.69758/GIMRJ/2509S01V13P010

# अनुसूचित जातीतील दुर्गम भागातील मागासलेल्या महिलांच्या सक्षमीकरणाची गरज

**संशोधक**
**नांव - कु. अस्मिता विठठलराव क्षीरसागर**
**शाळा** - जि.प.म.उ.प्रा.शाळा, काजेगाव
पं.स.जळगांव जामोद जि. बुलढाणा
**मो.** - ७५१७०५०७९७
**Email id** - asmitakokate09@gmail.com

## सारांश

भारत हा विश्‍वात मोठी यशस्वी लोकशाही, सांस्कृतिक वारसा असलेला देश आहे. अनुसूचीत जातीचा एक मोठा संवर्ग आपल्या देशाचा महत्वाचा भाग असून त्यातील महिलांच्या सक्षमीकरणाची आज काळाला ख-या अर्थाने गरज आहे. एका बहुसंख्य असलेल्याा संवर्गातील महिलांचे त्यांच्या सांस्कृतिक वारसा टिकविण्यामध्ये, त्यांच्या प्रगतीमध्ये मोलाचे स्थान आहे. अनेक जातीधर्माचे लोक इथे गुण्यागोविंदाने नांदतात. कोणत्याही देशाच्या प्रगतीचे मोजमाप हे त्या देशांच्या महिलांनी केलेल्या प्रगतीवर अवलंबून असते. अनुसूचीत जातीच्या स्त्रियांसंदर्भात सांगायचे झाल्यास शिक्षण हे मानसिक गुलामीतून बाहेर पडत स्वतःची आर्थिक स्थिती मजबूत करून राजकीय स्वातंत्र आणि सामाजिक दर्जा मिळविण्याचे ते एक धारदार हत्यार आहे आणि त्याचा तुम्ही वापर केला पाहिजे. आज भारतात अनुसूचीत जातीतील स्त्रियांवर होणारे अत्याचार वाढत आहेत. त्यांचे सक्षमीकरण करणे ही काळाची गरज आहे. अनुसूचीत जातीच्या महिलांना अनेक कौटूंबिक, आर्थिक, सामाजिक, शारिरीक, राजकिय अडचणींना सामोरे जावे लागते. त्यांचा सामाजिक दर्जा पाहता, अदयापही ग्रामीण भागातील अनेक स्त्रिया निर्धन, निरक्षर व पुरूषांच्या तुलनेत कमी प्रमाणात सुविधा, निम्न दर्जाच्या आहेत.

डॉ आंबेडकारानी हिंदू कोड बिलाद्वारे ब-याच कलमांतून स्त्रियांना वारसा हक्क, न्याय, समानता मिळवून देण्याचे यशस्वी प्रयत्न केले आहेत. शासकिय पातळीवर विविध योजनांव्दारे आर्थिक महिलांच्या सक्षमीकरणासाठी पाउले उचलली आहेत.

## प्रस्तावना

अनूसूचीत जातीच्या स्त्रिया अनेक दशकांपासून आर्थिक, नागरी, सांस्कृक्तिक आणि राजकिय अधिकारापासून वंचित आहेत. सामाजिक बहिष्कार हा त्यांच्या पाचवीलाच पुजलेला असतो. कौटुंबिक छळ, हिंसा, जुन्या बुरसटलेल्या सतीप्रथा, चुल आणि मूल यांचा समाज मनावर दूढ झालेल्या परिणामातून खालावलेला, निम्न दर्जा, आर्थिक, राजकिय सामाजिक समस्येचा विळखा, हक्कांची होणारी पायमल्ली, मानसिक कुचंबणा, मुलभूत अशा अनंत समस्यांमधून अनुसूचित जातीतील स्त्रियांचे सबलीकरण करणे, त्यांना सक्षम बनविणे ही आजच्या काळाची गरज आहे.

"Women And Work" हया पद्मिनी स्वामीनाथन यांनी २०१२ मध्ये संपादीत केलेल्या पुस्तकातून स्त्रिया आणि काम, स्त्रियांचा आर्थिक सहभाग ही कशा प्रकारे लिंगभावीकरणाचा परिणाम आहे, याचे विश्लेषण करते. भारतातील एकुण लोकसंख्येपैकी अनुसूचीत जातीच्या स्त्रियांची संख्या १६ टक्के आहे.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2509S01V13P010
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Sept'25
Issue–IX(I), Volume–XIII

समाजव्यवस्थेच्या जातीय उतरंडीतील अनुसूचीत जातीतील स्त्रिया सर्वात खालच्या जातीपैकी एक मानल्या गेल्या. आजच्या काळात हया स्त्रियांचे सक्षमीकरण करणे हे मोठे आव्हानात्मक कार्य आहे.

**अनुसूचित जातीतील स्त्रियांच्या अडचणी / समस्या :**

**कौटुंबिक हिंसाचार -**

महिलांना त्यांच्या लग्नानंतर अनेक समस्यांना तोंड दयावे लागते, या प्रकारातील समस्या हया ग्रामीण व शहरी भागात वेगवेगळ्या असू शकतात. मुलगा न झाल्यास मुलगी झाल्यास आई वडील शोक करतात, आईला जास्त दोषी ठरवितात. महिलांना त्यांच्या मर्जी विरूध्द गर्भलिंगनिदान करायला लावतात, स्त्री-भ्रूण हत्या मोठ्या प्रमाणावर होते. कौटूंबिक हिंसाचारात हुंडाबळी, माहेरून पैसे आणण्यासाठी मारहाण, मुले झाली नाहीत किंवा फक्त मुलीच झाल्या म्हणून शारिरीक त्रास, व्यसनी पती असल्याने संपुर्ण कुटूंबाची जबाबदारी, इत्यादी या समस्या कुटुंबाच्या दबावामुळे सर्वांसमोर येत नाहीत व पोलिसांत तक्रार दिली जात नाही.

**सामाजिक हिंसाचार –**

अनुसूचित जातीच्या स्त्रिया अनेक दशकांपासून, आर्थिक, नागरी, सांस्कृतिक आणि राजकिय अधिकारांपासून वंचित आहेत. सामाजिक बहिष्कार हा त्यांच्या पाचवीलाच पुजलेला असतो. अनुसूचित जातीच्या स्त्रिया हया केवळ जातीय भेदभावाच्या बळी नाहीत तर त्यांना बलात्कार, खुन, जबरदस्ती अपहरण आणि नग्न परेड यासारखे अमानुष अत्याचार सहन करावे लागतात. खैरलांजी हत्याकांड हे अमानुष, जळजळीत उदाहरण आजही आपण विसरू शकत नाही. छेडछाड, विनयभंग, एकतर्फी प्रेमातून केला जाणारा ॲसिड हल्ला, चाकू हल्ला, तसेच ऑफिसमध्ये काम करणा-या महिलांना ब-याच वेळा छेडछाडीला तोंड दयावे लागते या सगळयामागे पुरुषाच्या लेखी बाईचे असलेले दुयम स्थान, तिच्यावर त्याने प्रस्थापित केलेला मालकी हक्कच कारणीभूत आहे. स्त्रीयांवरील अत्याचाराच्या घटना घडल्यावर पडसाद अगदी रस्त्यापासून संसदेपर्यंत उमटतात, पण अशा घटना घडू नयेत याबाबत जनजागृती मात्र कमीच होते.

**आरोग्यविषयक समस्या -**

एका चांगल्या शरिरातच एक चांगले मन वास करते. Sound Mind in Sound Body, म्हणून आपले शरीर सर्वप्रथम सशक्त असणे गरजेचे आहे. विशेषतः स्त्रियांचे इतर समाजाच्या तुलनेत अनु. जातीच्या स्त्रियांचे खानपान, राहणीमान आर्थिक दुर्बलतेमुळे जरा कमी प्रतीचे आढळून येते. भारतातल्या दर दोन महिलांमागे एक महिलां कसल्या ना कसल्या अशक्तपणाच्या तक्रारीने ग्रस्त आहेत. ३५ टक्के महिला गंभीर स्वरूपाच्या अशक्त आहेत. तर १५ टक्के महिलांना कमी गंभीर स्वरूपाच्या अशक्ततेचा त्रास आहे. महिलांसाठी पुरेशा वैदयकिय सोयी उपलब्ध नसल्याने त्यांच्या मध्ये ही समस्या निर्माण झाली असल्याचे काही डॉक्टरांचे मत आहे. महिलांमधील कुपोषण व वाढता गर्भाशयाचा कर्करोग हा गंभीर स्वरूपाचा आजार असून ही गंभीर समस्या आहे. अनु. जातीच्या महिलांच्या सक्षमीकरणातील आरोग्यविषयक समस्या हा मोठा अडसर आहे.

**लैंगिक हिंसाचार -**

जागतिक महिलांच्या प्रश्नावर थॉमसन रॉयटर्स फाउंडेशन च्या एका सर्वेक्षणानूसार, महीलांच्या लैंगिक हिंसाचारासंदर्भात भारताला तसेच स्थानिक कामासाठी मानवी तस्करी, जबरीश्रम, जबरदस्ती विवाह, आणि लैंगिक गुलामगिरीचा ठपकाही ठेवला आहे. लैंगिक समस्या हया स्त्रियांनाही असतात, हे

आपला समाज कुठतरी नाकारतांना दुर्लक्ष करतांना दिसतो. फिझीटीडी किंवा जनरल सेक्शुअल डिस्फंक्शन या प्रकारात स्त्रियांना लैंगिक बाबतीत रूची नसते. त्यामुळे त्यांची याबाबत अनास्था दिसून येते. या शास्त्रोक्त बाबीकडे कमालीचे दुर्लक्ष पुरुषमंडळी करतात.

**शैक्षणिक समस्या -**

महिलांनी फक्त चुल आणि मूल याकडे लक्ष दिले पाहीजे. असे अनेक जणांना वाटते, पण महिलांनी आता चुला आणि मुला सोबतच देश आणि विदेश याकडे लक्ष देण्याची गरज आहे. प्राथमिक शिक्षणात स्त्रियांचे अनु. जातीतील प्रमाण चांगले असले तरी उच्च शिक्षणापर्यंत त्यास गळती लागते. पुरूषांच्या तुलनेत, इतर जातीच्या तुलनेंत अनु. जातीतील मुलींना रोजगाराच्या, उच्च शिक्षणाच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होतात. ग्रामीण भागातील, दुर्गम, मागासलेल्या स्त्रिया तर अजुनही स्वतःचे शैक्षणिक निर्णय स्वतः घेवु शकत नाहीत. घटनेने त्यांना अनेक शैक्षणिक अधिकार दिले आहेत. परंतू याची माहिती त्यांच्या पर्यंत पोहोचली पाहिजे, स्त्री अजुनही १०० टक्के सक्षम आहे, असे आपण म्हणू शकत नाही.

**अनुसूचित जातीतील महिलांच्या सक्षमीकरण बाबत सामाजीक दृष्टीकोन-सदयस्थिती -**

मानव समुहात स्त्री जातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. अनुसूचीत जातीच्या स्त्रियांना हतोत्साहीत करणारे वर्णन करून त्यांचा जीवनस्तर उंचवण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हीनत्वाची वागणुक स्त्री जातीला मिळत राहीली आहे. हा भेदभाव दुर करून स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मीती आणि त्याचे सूचालन करणे आणि लैंगिक समतेव्दारे (Gender Equality) समाजाचे संतुलन साधणे यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टीकोन केलेली कृती यांचा समुच्यय म्हणजे स्त्री सक्षमीकरण असे थोडक्यात म्हणता येईल. मानवी हक्काविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारात मान्यता मिळूनही स्त्रिया निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. वैदयकिय सुविधा, मालमत्तेची मालकी, पतपूरपठा प्रशिक्षण आणि रोजगारात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना विशेषतः अनुसूचित जातीच्या स्त्रियांना कमीच मिळते. राजकियदृष्टया हया स्त्रिया सक्रीय असण्याची संधी फारच कमी आहे आणि त्या घरगुती हिंसाचाराच्या बळी होण्याची शक्यता खुपच मोठी आहे. स्त्रियांबद्दलची अशी हीनत्वाची, सामाजीक मानसिकता, सामाजीक दृष्टीकोन बदलणे फारच गरजेचे आहे.

**अनुसूचित जातीतील महिलांचा सामाजिक दर्जा -**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानव विकास निर्देशांकाव्दारा केल्या गेलेल्या लैंगिक असमानतेच्या मुल्यांकनात १५५ देशापैकी भारत १३० व्या क्रमांकावर आहे. अनुसूचित जातीच्या स्त्रियांमध्ये सामाजीक असंतुलन आर्थिक आणि राजकिय शक्ती समीकरणाच्या परिणामी लैंगिक हिंसाचाराला सामोरे जावे लागते. भारतात अशा सवर्ण उच्च जातीच्या स्त्रिया बाळगत असलेला आत्मसन्मान सहन होत नाही. अशा जाती त्यांच्या आवाजाला दाबण्यास तत्पर असतात. त्यामुळेच, अनुसूचित जातींच्या महिलांचे सक्षमीकरण करणे हे मोठे आव्हानात्मक आहे. न्यूनगंड व भीतिमुळे अनुसूचित जातीतील स्त्रिया स्वतःच्या अत्याचाराबद्दल बोलण्यास अजुनही सक्षम झालेल्या नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकारांनी स्पष्ट शब्दांत म्हटले होते की, कोणत्याही देशाच्या प्रगतीतचे मोजमाप हे त्या देशाच्या महिलांनी केलेल्या प्रगतीवर अवलंबून असते. अनूसूचित जातीच्या स्त्रियांसंदर्भात ते म्हणतात, शिक्षण हे मानसिक गुलामीतून बाहेर पडत स्वतःची आर्थीक स्थिती मजबूत करून राजकिय

स्वातंत्र आणि सामाजीक दर्जा मिळविण्याचे ते एक धारदार हत्यार आहे आणि त्याचा तुम्ही वापर केला पाहीजे. आज भारतात अनुसूचित जातीच्या स्त्रियांवर होणा-या अत्याचाराच्या चर्चा करणे हे अनिवार्य आहे. त्यामुळे अनुसूचित जातीच्या स्त्रीयांवर होणा-या अत्याचारावर विविध माध्यमांद्वारे सरकारी यंत्रणेवर दबाव आणून प्रभावी उपाययोजना करण्यास भाग पाडता येईल.

**अनुसूचित जातीतील महिलांसाठी करण्यात आलेल्या उपाययोजना, ध्येयधोरणे, तरतूदी -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखिल भारतीय स्त्रियांसाठीच हिंदूकोड बिलाव्दारे मुक्तीचा नवा मार्ग तयार करून दिला. स्वतंत्र भारताच्या संपूर्ण स्त्रियांच्या प्रगतीमागे फक्त एकाच महापुरूषाचा हात आहे आणि ते म्हणजे बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर. त्यांनी

- मुलींना शिक्षणाचा अधिकार दिला.
- स्त्रीयांना वारसा हक्क दिला.
- स्त्रियांना घटस्फोट घेण्याचा अधिकार दिला.
- घटस्फोटीता महिलांना पोटगी मागण्याचा अधिकार दिला.
- पुनर्विवाह करण्याचा कायदेशीर अधिकार.
- १८ वर्षावरील सर्वांनाच मतदानाचा अधिकार दिला.
- महिलांना प्रसुतीची रजा देण्याचा अधिकार.
- दिवसाचे ७ तास कामगार स्त्रियांना मंजूर केले.
- चूल, मुल, सती, बहुविवाह हया प्रथा कायदयाने नष्ट केल्या. हिंदूकोड बिल २४ फेब्रुवारी १९४९ रोजी या दिवशी संसेदत मांडले गेले, त्यात आठ अधिनियम बनवले आहेत.

१. हिंदू विवाह अधिनियम
२. विशेष विवाह अधिनियम
३. दत्तक घेणे, दत्तक ग्रहण अल्पायू संरक्षीता अधिनियम
४. हिंदू वारसदार अधिनियम
५. दुर्बल आणि साधनहीन कुटुंबातील सदस्य यांना भरण पोषण अधिनियम
६. अप्राप्तवय संरक्षण संबंधी अधिनियम
७. वारसदार अधिनियम
८. हिंदू विधवाला पुनविर्वाह अधिनियम

अशाप्रकारे अनु. जातीच्या स्त्रिया समवेत सगळ्यांनाच या अधिनियमाव्दारे सशक्त होण्यास कायदयाचे पाठबळ मिळाले.

**अनुसूचित जाती / जनजाती अत्याचार प्रति बंधक कायदा १९८९ -**

नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९९५ अन्वये अस्पृश्यता पाळणे व ती पाळण्यास उत्तेजन देणे हा गुन्हा समजण्यात येत असून त्यासाठी सदर अधिनियमात शिक्षेची तरतूद करण्यात आलेली असून अनुसूचित जाती /जमातींवर होणा-या अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी अनु. जाती / जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ लागू करण्यात आलेला आहे. ज्या अधिनियमात १९९५ मध्ये केंद्र शासनाने

सूधारणा केल्या असून या सूधारणा महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आल्या आहेत. ३० जानेवारी १९९० अंमलजावणी

- शासकिय स्तरावरील अनुसूचित जाती जमातीसाठी आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध योजना
- स्टॅन्डअप इंडिया योजना
- ५ एप्रिल २०१६ रोजी सूरू करण्यात आली अनुसूचित जाती /जमाती आणि महिला अशा दुर्बल आणि वंचित घटकांमधील उदयोजकांसाठी संस्थात्मक पुरवठा केला जातो
- प्रधानमंत्री मुद्रा योजना
- ८ एप्रिल २०१६ रोजी सूरू करण्यात आली. हया योजनेअंतर्गत बिगर कॉर्पोरेट अकृषक अशा लघू आणि सुक्ष्म उदयोजकांना १० लाख रू पर्यंत कर्ज उपलब्ध केले जाते. पीएमएमवाय योजना एकुण कर्जदारांपैकी ७० टक्के महीला अनु. जाती आहेत.
- प्रधानंमत्री जनधन योजना -

पीएमजेडीवाय ही योजना ९ मे २०१५ रोजी सुरू करण्यात आली. १८ ते ५० वय वर्ष वयोगटातील गरीब आणि वंचीत घटकांना सामाजीक सुरक्षा व्यवस्था देणे हा उदेदश आहे. ३३० रूपयात २ लाखांचा विमा देण्यात येतो.

**पारिभाषिक शब्द : -**

१) **महिला सक्षमीकरण –** महिलांना न्याय व अधिकार प्रदान करणे
२) **मागासवर्गीय –** सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असलेल्या नागरिकांचा समूह
३) **वंचित –** दुर्लक्षित
४) **लिंग भावीकरण –** लिंगाच्या आधारावर असमान किंवा प्रतिकूल वागणूक
५) **लैंगिक हिंसाचार –** एखाद्या व्यक्तीच्या संमतीशिवाय जाणून बुजून केलेले लैंगिक कृत्य किंवा हिंसा
६) **दुर्बल –** असहाय
७) **न्यूनगंड –** इतरांपेक्षा कमी, अपूर्ण असल्याची भावना होय

**निष्कर्ष -**

- अनुसूचीत जातीमधील महिला सक्षमीकरणामध्ये अजुनही विविध प्रकारच्या योजनांची कार्यवाही करणे आवश्यक आहे.
- महिला सक्षमीकरण ही काळाची गरज आहे.
- शासकिय योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण करणे आवश्यक आहे.
- मानवी विकासामध्ये महिलांचे योगदान अतुलनीय राहीले आहे
- भारतीय लोकशाहीत स्त्री व पुरूष ही विकास रथाची एक समान चाके आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

- आंबेडकर, डॉ. भीमराव रामजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गाजलेले लेख, नेहा प्रकाशन, नागपूर १७, संस्करण-२४ ऑक्टोंबर, २०१२.
- खैरमोडे चांगदेव भगवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड १, सुगावा प्रकाशन, पुणे-३० कालखंड, १९४७ ते १९५२

https://doi.org/10.69758/GIMRJ/2509S01V13P010


- निकम गौतम प्रा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री-स्वातंत्र, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगांव जि. जळगांव, तिसरी आवृत्ती २४ ऑक्टोंबर २०१६ वृत्तपत्रे.
- प्रबुध्द भारत-पाक्षिक संपा. ॲड. प्रकाश यशवंत आंबेडकर १६ ते ३० नोव्हेंबर २०१७
- सम्राट
- लोकसत्ता
- माहिती पुस्तिका - वाटचाल सामाजिक न्यायाच्या दिशेने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन २९/०१/२०११
- पवार, श्रीराम संपा., सकाळ, दिक्षा विशेषांक, २०१३
- पवार, श्रीराम संपा., सकाळ, दिशा विशेषांक, २०१५
- Jathani Urmila, Single Women, Rawat publications Jaipur & New Delhi 1994.
- गुप्ता कमलेशकुमार २००५, महिला सशक्तीकरण, बुक एन्क्लेव्ह जयपूर, पृ.४३
- शरण डी. के २००७, भारतीय इतिहास से नारी, क्लासिक पब्लिशिंग कंपनी, नई दिल्ली, पृ.३४
- राजकुमार २००९, महिला एवं विकास, अर्जुन पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली
- खडसे संतोष २०१०, 'ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया', शुभम पब्लिकेशन, पुणे पृ.१०
- लांजेवार ज्योती २००५, भारतीय समाज आणि स्त्री, सुगावा प्रकाशन, पुणे - ३०